# महात्मा गांधी कला वाणिज्य महाविद्यालय,पारशिवनी.जि.नागपूर

## राष्ट्रीय सेवा योजना

सत्र – 2020–2021

युवा म्हटले की स्वामी विवेकानंद, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज या महाविभूतींची प्रतिमा आपल्या डोळ्यासमोर येते. त्यांनी युवकांच्या आरोग्यासाठी, खेड्यातील ग्राम स्वच्छतेसाठी केलेले महान कार्य आपल्या डोळ्यासमोर एखाद्या चलचित्रा प्रमाणे दिसू लागले. तेव्हा आपले मन पाण्याचे वृक्षां वर सिंचन केल्या नंतर जसे ताजे तवाने आणि प्रफूल्लीत दिसते, तसे मन प्रफुल्लीत होऊन जाते. त्यामुळे युवा शक्ती जागृत होत असते.

आमच्या महाविद्यालयात 1993 मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात झाली. 50 विद्यार्थ्यांपासून सुरु झालेले हे पथक आज 250 विद्यार्थ्यांचे आहे. या योजनेत सहभागी होणाऱ्या स्वयंसेवकांची 15 जून ते 31 जुलै या कालावधीत नोंदणी करण्यात येते. नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात येवून राष्ट्रीय सेवा योजनेची माहिती दिली जाते. योजनेचे उद्घाटन झाल्यानंतर प्रत्यक्ष कार्याला सुरुवात होते. या योजनेत त्रिस्तिरीय कार्यक्रम राबविण्यात येते. यात विद्यार्थ्यांना 120 तास काम करणे आवश्यक आहे.

सत्र 2020–21 मध्ये महाविद्यालयात विद्यार्थ्यांना एकुण 01 वेळा श्रमदान करुन परिसराची स्वच्छता केली तसेच ग्राम पालोरा येथे श्रमदान व वृक्षारोपण केले. स्वच्छते विषयी पथनाट्याव्दारे जाणीव जागृती केली.

बौध्दीक कार्यक्रमांतर्गत संविधान दिन , योगदिन ,रस्ता सुरक्षा सप्ताह ,शिक्षक दिन एडस सप्ताह,तंबाखु अभियान,महात्मा गांधी जयंती, महात्मा ज्योतिबा फुले जयंती, सावित्रीबाई फुले जयंती, स्वामी विवेकांनद जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आभासी पद्धतीने साजरी करण्यात आली.

24 / 09 / 9ला राष्ट्रीय सेवा योजना दिन आभासी पद्धतीने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थायी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.लोकचंद्र जाधव होते.

PRINCIPAL
M. G. Arts & Commerce College
Parseoni. Dist. Nagpur

प्रा.डॉ. राकेश कर्मे
कार्यक्रम अधिकारी

IQAC CO-ORDINATOR
Mahatma Gandhi Arts & Commerce College
Parseoni, Dist. Nagpur